# प्रेस नोट
# TECH EXPO 2018
# समारोपन कार्यक्रम

जा.क्र. १०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०२/२०१८

**भंडारा** :— दिनांक २४/०२/२०१८ ते २५/०२/२०१८ पर्यत छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल, येथे भंडारा पोलीस विभागाच्या वतीने ' **टेक्स एक्स्पो २०१८**' या कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उप अधिक्षक(गृह) कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीकांत डिसले, उपस्थित होते.

यावेळी समारोप कार्यक्रम मध्ये मा. विनीता साहू यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, सर्व अधिकारी, कर्मचारी, तसेच शाळकरी व महाविद्यालयीन मुले, महिला व बाल विकास अधिकारी, विधी सेवा प्राधीकरण, फॉरेन्सीक सायन्स या सर्वांनी अगदी कमी वेळात चांगली मेहनत घेवून कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मोलाची भुमिका पार पाडली आहे. आमचा जो उद्देश होता तो परीपुर्ण झालेला आहे. तसेच पोलीसांची कामगिरी व भुमीके बद्दल माहिती सांगितली तसेच पोलीसा बद्दलचे गैरसमज दुर व्हावे मनातील भिती जावी, हा यामागचा उद्देश आहे. समाजात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता पोलीस कार्य करतात. चारही विभागांर्तगत पोलीस स्टेशन हद्दी मध्ये फिरते पोलीस स्टेशन घेण्यात येत आहे. मुले  मुले, मुली घरुन जावुन पळुन जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. जावुन लग्न करतात. मुलामुलीचे घरातून पळून जावून लग्न करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. मुले मुलींना पळवून नेतात, त्यामुळे त्यांचे विरूध्द अपराधाचे गुन्हे दाखल होवून त्यांचे उज्वल भविष्य धोक्यात येते, याबाबत माहिती दिली.

समारोप कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मनोहरभाई पटेल अभियांत्रीकी महाविद्यलय, भंडारा यांना प्रथम पारीतोषीक, प्रिव्हीयन्स फॉरेन्सिक टेक्नालॉजी, नागपुर यांना व्दितीय पारीतोषीक आणि  फॉरेन्सीक इंस्टीटयुड कॉलेज नागपुर यांना तृतीय पारीतोषीक देण्यात आले. त्याचप्रमाणे  भंडारा पोलीस विभागातील फिरते पोलीस स्टेशनला  प्रथम पारीतोषीक, ऑनलाईन तक्रार सुविधा (सिटीजन पोर्टल) यांना व्दितीय पोरीतोषीक आणि अॅन्टी नक्षल सेल यांना तृतीय पारीतोषीक देवनू गौरविण्यात आले.

समारोपन कार्यक्रमाचे सुत्र संचालन मुंकुद ठवकर व स्मिता गालफाडे तसेच आभार प्रदर्शन पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. एस.व्हि. कुलकर्णी यांनी केले.

( एस.व्ही कुलकर्णी )
**पोलीस उप अधिक्षक (गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा :— भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.